मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर २०२३ । पान १

# ‘आयटी’ परिसरात लाखो अनधिकृत बांधकामे ‘पीएमआरडीए’मध्ये अनागोंदी

## केवळ नोटिसा देऊन दिखाऊपणाची चर्चा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत ‘आयटी पार्क’ आहे. मात्र, या परिसरातील गावात लाखोंच्या संख्येने अनधिकृत बांधकामे झाली आणि आजही राजरोस सुरू आहेत. त्यामुळे ‘आयटी’च्या चहूबाजूंनी ओंगळवाणे अनधिकृत काँक्रिटचे जंगल वाढले आहे. या अंदाधुंद बांधकामांमुळे नागरी सुविधांवर आताच प्रचंड ताण आला आहे. भविष्यात देखील विकास आराखड्याला यामुळे खीळ बसणार आहे.

तुकडाबंदीच्या कायद्याला केराची टोपली दाखवून, गुंठा- दोन गुंठे जागेची खरेदी विक्री जोमात आहे. गुंठाभर जागेत आठ ते दहा मजली इमारती उभ्या राहत



असताना ‘पीएमआरडीए’चे अधिकारी केवळ नोटिसा बजावण्याचा दिखाऊपणा करून काणाडोळा करत आहेत. त्यामुळे अनधिकृत बांधकामांचे अमाप पीक बहरत असल्याचा आरोप होत आहे. या पिकांचे मोठ्या सिमेंटच्या जंगलात रूपांतर होत आहेत. या बांधकामांना आवर घालण्याऐवजी लाखोंची ‘तडजोड’ करून मुभा दिली जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे या लाखो बांधकामांना आवर घालणार कोण असा प्रश्न आहे. प्रस्तावित रिंगरोड व डीपी रस्त्यांनादेखील या अनधिकृत बांधकामांचा मोठा विळखा पडला आहे. त्याचेदेखील पीएमआरडीए प्रशासनाला काही देणे-घेणे नाही. ही अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी ‘पीएमआरडीए’कडून कुठल्याही ठोस उपाययोजना अथवा हालचाल होताना दिसून येत नाहीत. देशाच्या कानाकोपऱ्यातून हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, जांबे, कासारसाई या भागात नोकरीनिमित्त लाखोंच्या संख्येने चाकरमानी वास्तव्यास आले आहेत. कंपनीजवळच निवारा करण्यासाठी गुंठेवारीमध्ये अनधिकृत बांधकामांचे अक्षरशः पेव फुटले आहे.

### गाव कारभाऱ्यांमार्फत तडजोड

**» ‘पीएमआरडीए’च्या या कारभाराला वैतागून मारुंजीतील सुमारे दोनशे नागरिकांनी गाव महापालिकेत घ्यावे म्हणून आयुक्तांना सह्यांचे निवेदन दिले होते. तर; काही सुज्ञ नागरिकांनी प्राधिकरणाकडे तक्रारी करूनही अधिकारी केवळ नोटीस बजावण्याची जुजबी भूमिका घेतात. त्यासाठी काही ‘गाव कारभारी’ या आर्थिक तडजोडीच्या या धंद्यात आघाडीवर आहेत. नोटिशीनंतर कुठलीही ठोस कारवाई होत नसल्याने अधिकाऱ्यांच्या कृपादृष्टीने या बांधकामांना संरक्षण मिळत असल्याची चर्चा आयटी परिसरात रंगली आहे.**

आयटी परिसर व लगतच्या प्रत्येक गावात रात्रंदिवस सुरू असलेल्या हजारो अनधिकृत बांधकामांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी ग्रामपंचायतींवर ताण येत आहे. आयटी परिसराचे असंख्य प्रश्न व विविध नागरी सुविधांच्या समस्या नागरिकांना भेडसावत आहेत. इमारतीला लागून इमारतीचे जाळे उभे राहिल्याने या भागाचा बकालपणा वाढला आहे. वाहतूक व्यवस्था कोलमडल्याने कोंडी नित्याची झाली. मल:निस्सारण, ड्रेनेज सुविधेचा अभाव आहे. कचरा समस्येचा उद्रेक होत आहे. पाणी पुरवठा व्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला आहे.

---

# साडेचार वर्षाच्या मीरा सोलंकीला यंगेस्ट रनरचा किताब

## पाच किलोमीटरमध्ये पटकाविला प्रथम क्रमांक

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

सिंपल स्टेप संस्थेमार्फत फिट इंडिया या संकल्पनेवर आधारीत मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये साडेचार वर्षाच्या मीरा सोलंकीने यंगेस्ट रनर म्हणून पाच किलोमीटरमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्यामुळे सर्वत्र तिच्यावर कौतुकाचा




वर्षाव होतो आहे.

पुणे विद्यापीठ येथे ही मॅनेथॉन पार पडली. यामध्ये सुमारे पाचशे स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. पाच ते १४ वर्षे वयोगटासाठी ही स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये साडेचार वर्षाच्या मीरा सोलंकी हिने पाच किलोमीटरमध्ये धावण्यात प्रथम क्रमांक पटकाविला. मागील एक वर्षापासून तिचे प्रशिक्षक प्रीत सोलंकी सराव घेत आहेत.

प्रशिक्षक प्रीत सोलंकी म्हणाले, मागील एक वर्षापासून मीरा चे प्रशिक्षण सुरु आहे. प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांना लहानपणापासून मुलांना आरोग्याबाबत जागृत केले पाहिजे. मोबाईल आणि इंटरनेटच्या जाळ्यात गुरफटत चालली पिढी अशा स्पर्धा, मैदानी खेळ घेऊन वाचवली पाहिजे.

# अंगणवाडी मदतनिसांचा प्रश्न सोडवण्याचे भाजप महिला पदाधिकाऱ्यांचे आश्वासन!

## अंगणवाडी सेविकांचा भाजप कार्यालयावरील मोर्चा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** आपल्या विविध मागण्यांसाठी अंगणवाडी सेविका सत्ताधारी पक्षाच्या खासदार आमदारांच्या कार्यालयावर मोर्चे निदर्शने आदी मार्गाने आंदोलन करत आहेत. पिंपरीमध्येही शहर भाजप कार्यालयावर अंगणवाडी कर्मचारी सभा महाराष्ट्र यांच्या वतीने सोमवारी (दि. ११) मोर्चा काढण्यात आला. मात्र हा मोर्चा पोलिसांनी मोरवाडी रस्त्यावर मध्येच अडवला. दरम्यान पिंपरी चिंचवड भारतीय जनता पक्ष महिला अध्यक्ष सुजाता पलांडे, माजी नगरसेविका वैशाली खाडे आदी पदाधिकारी या मोर्चाला सामोरे जाऊन मागण्यांचे निवेदन स्वीकारले. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे अंगणवाडी सेविका मदतनीस यांना कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा. त्यांना मानधन ऐवजी वेतन लागू करावे. ही प्रक्रिया




पूर्ण होईपर्यंत मानधनात भरीव वाढ करावी आदी मागण्यासाठी चार डिसेंबर पासून राज्यभरातील एक लाख अंगणवाड्यांचे बंद आंदोलन सुरू झाले आहे.
यावेळी बोलताना संघटनेचे अध्यक्ष नितीन पवार म्हणाले, सन १९७५ साली अंगणवाडीची म्हणजे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची सुरुवात झाली. या योजनेमार्फत गरीब वस्त्या गाव-पाड्यातील बालकांना पूरक पोषक आहार, पूर्व प्राथमिक शिक्षण, गरोदर महिलांना आहार, लसीकरण, लोकसंख्या शिक्षण इत्यादी महत्त्वाचे काम केले जाते. ते करणाऱ्या अंगणवाडी सेविका मदतनीस या देशाच्या मानवी विकासदूत म्हणूनच काम करतात. मात्र त्यांना अतिशय कमी मानधनावर काम करावे लागते. याबाबत सातत्याने आंदोलन करूनही अंगणवाडी सेविकांना पुरेसे मानधन मिळत नाही. आता आपल्या हक्कांसाठी अंगणवाडी सेविकांनी निकराची लढाई करायचे ठरवले आहे आज आम्ही सत्ताधारी पक्षाच्या कार्यालयाच्या बाहेर थांबलो आहोत. पण प्रश्न सुटले नाही तर लोकशाही मार्गाने कार्यालयात येऊन ठिय्या देऊ, असा इशाराही नितीन पवार यांनी दिला.
दरम्यान गुजरात येथील अंगणवाडी सेविकेने दाखल केलेल्या याचिकेवर निकाल देताना अंगणवाडी सेविका या मानसेवी नसून कर्मचारी आहेत. त्यांना मिळणारे मानधन हे वेतनच आहे. त्या प्रॉव्हिडन्ट फंड, ग्रॅच्युटी इत्यादी सर्व सामाजिक सुरक्षा मिळण्यासाठी पात्र आहेत. असा महत्त्वपूर्ण निकाल मागील वर्षी सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निकालाची अंमलबजावणी करावी आणि तातडीने अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना वेतन लागू करावे, या सध्या सुरू असलेल्या आंदोलनाच्या प्रमुख मागण्या आहेत.
या मागण्या घेऊन सोमवारी पिंपरी चिंचवड महापालिका शेजारील (झळाऑॅळ) आदर्श राज्यकर्ती अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी मोर्चाला सुरुवात केली. मानधन नको दयेचे – वेतन हवे हक्काचे, भाऊबीज नको दयेची – बोनस हवा हक्काचा, आम्हाला टेन्शन – तुम्हाला पेन्शन, आम्हाला पेन्शन मिळालीच पाहिजे आदी घोषणा देत मोर्चा भाजप कार्यालयाकडे निघाला. त्याआधी पिंपरी पोलिसांनी अशाप्रकारे कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयावर मोर्चा काढता येणार नाही अशी नोटीस संघटनेच्या पदाधिकार्यांना बजावली होती. मात्र राजकीय पक्ष हे लोकांशी संबंधित असून कुणाच्या व्यक्तिगत घरांवर आम्ही मोर्चा काढत नाही. सत्ताधारी राजकीय पक्षच शासनात धोरण ठरवत असतात. भारतीय जनता पक्ष हा केंद्रात आणि राज्यात सत्तेवर आहे. भारतीय जनता पक्षाच्याच स्मृती इराणी या महिला बालविकास मंत्री आहेत. म्हणून या पक्षाच्या स्थानिक कार्यालयावर आम्ही मोर्चा काढत आहोत.

# राष्ट्रवादीच्या साखळी उपोषणाला आयटीकरांचा पाठींबा

## पुनावळे येथील कचरा डेपो विरोधात उपोषण

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु असलेल्या साखळी उपोषणाचा आजचा चौथा दिवस होता. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पुनावळे येथे रहिवासी भागात कचरा डेपो आणण्याचा घाट घातला असल्याचा राष्ट्रवादीचा आरोप आहे. यास स्थानिक रहिवासी आणि आणि आयटीमध्ये काम करणाऱ्या नागरिकांचा विरोध आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी रविवारची




सुट्टी असल्याने पुनावळे येथे राहत असलेल्या अनेक आय. टी. करांनी या आंदोलनास मोठ्या संख्येने पाठिंबा दिला.
यावेळी तुषार कामठे म्हणाले कि, पुनावळे येथील कचरा डेपो विरोधात कोर्टात जाणार आहे आणि स्थागितीची ऑर्डर आणणार आहे. मोठ्या प्रकल्पाऐवजी छोटे प्रकल्प राबवावेत जेणेकरून कचऱ्याची वाहतूक करण्याचा ताण कमी होईल. सोबतच आयुक्तांशी चर्चा करून हा प्रकल्प रद्द करण्यासाठी बोलणी करणार आहे. या आंदोलनात सिध्दशीला, पुणेविले, कोहिनुर वेस्ट विजे यशवन, इला, ट्रीन आर्क, लाईफ रिपब्लिक जीके रोज एॅस्टर अशा अनेक गृहनिर्माण संस्थांच्या प्रतिनिधींनी आंदोलनाला पाठिंबा देत हजेरी लावली. राज्यात भाजपचे सरकार आहे आणि महानगरपालिकेवर अप्रत्यक्षरीत्या भाजपचाच अंकुश आहे आहे.
हा कचरा डेपो दुसरीकडे स्थलांतरित करण्यात किंवा बंद करण्यात भाजपला रस नाही. भाजपचे अनेक नगरसेवक आणि पदाधिकारी कचरा डेपो हलवण्यासाठी आंदोलन करायचे ढोंग करत आहेत.
पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या कचरा डेपोस तीव्र विरोध केला आहे. यावेळी माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत, राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, सरचिटणीस जयंत शिंदे, शकुंतला भाट, प्रदेश सरचिटणीस राजन नायर, समन्वयक गणेश भोंडवे, अशोक तनपुरे, काशिनाथ जगताप, चिंचवड विधानसभा अध्यक्ष सागर चिंचवडे, विजयकुमार पिरंगुटे, विवेक विधाते, संतोष माळी, राजेश हरगुडे, सुशील घोरपडे, मुख्य प्रवक्ते माधव पाटील आदी उपस्थित होते.

# पारंपरिक पदविका अभ्यासक्रम बंद!

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

## पदविका अभ्यासक्रमाऐवजी प्रगत अभ्यासक्रम सुरू?




### पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान

**» अभ्यासक्रमांऐवजी महाविद्यालयांना बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पायाभूत अभ्यासक्रम (फाऊंडेशन), तर पदवीधरांसाठी प्रगत अभ्यासक्रम (ॲडव्हान्स्ड) अभ्यासक्रम सुरू करता येणार असून, पारंपरिक पदविका अभ्यासक्रम बंद होणार आहेत. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांकडून कौशल्य विकासासाठी विविध प्रमाणपत्र, पदविका, प्रगत पदविका अभ्यासक्रम राबवले जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने प्रचलित प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका आणि पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान (नोमेनक्लेचर), श्रेयांक, कालावधी आदींबाबत धोरण ठरविण्यासाठी डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या आराखड्यात बदल केले आहेत. या बदलांची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून केली जाणार आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांऐवजी महाविद्यालयांना बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पायाभूत अभ्यासक्रम (फाऊंडेशन), तर पदवीधरांसाठी प्रगत अभ्यासक्रम (ॲडव्हान्स्ड) अभ्यासक्रम सुरू करता येणार असून, पारंपरिक पदविका अभ्यासक्रम बंद होणार आहेत. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांकडून कौशल्य विकासासाठी विविध प्रमाणपत्र, पदविका, प्रगत पदविका अभ्यासक्रम राबवले जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने प्रचलित प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका आणि पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान (नोमेनक्लेचर), श्रेयांक, कालावधी आदींबाबत धोरण ठरविण्यासाठी डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीचा अहवालानुसार २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन रचना लागू करण्यास विद्यापीठाने मान्यता दिली. त्यामुळे आता प्रमाणपत्र अभ्यासक्रमाऐवजी पायाभूत अभ्यासक्रम, पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाऐवजी प्रगत अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे. त्या बाबतचे परिपत्रक विद्यापीठाने संकेतस्थळावर प्रसिद्ध केले. विद्यापीठाचे विभाग, सर्व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांनी सध्या अस्तित्वात असलेले सर्व प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका व पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान, श्रेयांक, कालावधी, अभ्यासक्रम या बाबतची माहिती ३० डिसेंबरपर्यंत अद्ययावत करावी लागणार आहे. त्यासाठीची सुविधा विद्यापीठाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिलेल्या मुदतीत माहिती अद्ययावत न केल्यास पुढील शैक्षणिक वर्षापासून अशा अभ्यासक्रमाला मान्यता मिळणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या आराखड्यात बदल केले आहेत.

# विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दूरगामी परिणाम!

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

## मुलींच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा निर्णय



### विविध स्तरावर समित्या गठित

**» संरक्षण कायद्यानुसार सर्वच बालकांच्या हिताचे, हक्कांचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे. सद्य:स्थितीत मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेबाबत प्राधान्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. घर, शाळा आणि समाजात मुला-मुलींना सुरक्षित व बालस्नेही वातावरण मिळावे तसेच त्यांचे सामाजिक, भावनिक, अध्ययन उत्तमरीत्या व्हावे, यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२५व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने विविध स्तरावर समित्या गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी, निकोप आणि समतामूलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याबाबत राज्य सरकारने निर्देश दिले आहेत. तसेच समितीचा अहवाल कार्यालयास पाठवण्याच्या सूचनाही विभागीय शिक्षण उपसंचालकांनी दिलेल्या आहेत.**

करोना काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दूरगामी परिणाम झालेले आहेत, पालकांच्या स्थलांतरामुळे शाळाबाह्य मुला-मुलींचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच राज्यात बालविवाहांचे वाढते प्रमाण चिंताजनक असल्याची भीती व्यक्त करत शालेय शिक्षण विभागाने शालेय मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये मुला-मुलींची सुरक्षितता, निकोप आणि समतामुलक वातावरण निर्माण करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने विविध स्तरावर 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक शाळेला समिती स्थापन करावी लागणार आहे. बालहक्क संरक्षण कायद्यानुसार सर्वच बालकांच्या हिताचे, हक्कांचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे. सद्य:स्थितीत मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेबाबत प्राधान्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. घर, शाळा आणि समाजात मुला-मुलींना सुरक्षित व बालस्नेही वातावरण मिळावे तसेच त्यांचे सामाजिक, भावनिक, अध्ययन उत्तमरीत्या व्हावे, यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२५व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने विविध स्तरावर समित्या गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी, निकोप आणि समतामूलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याबाबत राज्य सरकारने निर्देश दिले आहेत. तसेच समितीचा अहवाल कार्यालयास पाठवण्याच्या सूचनाही विभागीय शिक्षण उपसंचालकांनी दिलेल्या आहेत.राज्यातील सर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये मुला-मुलींची सुरक्षितता, निकोप समतामुलक वातावरण निर्माण करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने विविध 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक शाळेला समिती स्थापन करावी लागणार आहे.

# जिल्ह्यातील धरणांमध्ये ६७ % पाणीसाठा

## गतवर्षीच्या तुलनेत ६० टीएमसी कमी



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे जिल्ह्यातील २६ धरणांमध्ये मिळून आजअखेरपर्यंत (ता.११) फक्त १३३.१२ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. सध्याच्या उपयुक्त पाणीसाठ्याचे हे प्रमाण एकूण पाणीसाठ्याच्या तुलनेत ६७.११ टक्के इतके आहे. दरम्यान, यंदाच्या पावसाळ्यात कमी पाऊस झाल्याने, गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेच्या तुलनेत सध्याचा पाणीसाठा हा ६०.३० टीएमसीने कमी आहे. गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेला जिल्ह्यातील धरणांमध्ये एकूण १९३.४२ टीएमसी इतका पाणीसाठा उपलब्ध होता. गेल्या वर्षीच्या या उपलब्ध पाणीसाठ्याचे प्रमाण हे ९७.५१ टक्के इतके होते. त्यामुळे यंदाचा आजअखेरचा उपलब्ध पाणीसाठा हा गेल्या वर्षीच्या तुलनेत ३०.४० टक्क्यांनी कमी झाला आहे.

या २६ धरणांव्यतिरिक्त टाटा समूहाच्या सहा धरणांमधील पाणीसाठा वेगळा आहे. पुणे जिल्ह्यात एकूण ३२ धरणे आहेत. यापैकी सहा धरणे ही टाटा समूहाची आहेत. टाटा समूहाची धरणे वगळता उर्वरित २६ धरणे आहेत. पुणे जिल्ह्यातील धरणांमध्ये उजनी, भामा आसखेड, माणिकडोह, चासकमान, पवना, मुळशी, टेमघर, वरसगाव, पानशेत, गुंजवणी, नीरा देवधर, भाटघर, वीर आदी प्रमुख धरणांचा समावेश आहे.सर्व प्रमुख धरणांसह जिल्ह्यातील सर्व धरणांतील मिळून एकूण उपयुक्त पाणीसाठा क्षमता ही १९८.३४ टीएमसी इतकी आहे. दरम्यान, पुणे शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील चार धरणांमध्ये मिळून आजअखेरपर्यंत २४.१० टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. या चार धरणांमध्ये टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला यांचा समावेश आहे. गेल्या वर्षी आजच्या तारखेपर्यंत या चार धरणांमध्ये एकूण २६.३५ टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहिला होता. यानुसार गतवर्षीच्या तुलनेत यंदा खडकवासला प्रकल्पातील चार धरणांमधील एकूण पाणीसाठा हा २.२५ टीएमसीने कमी असल्याचे स्पष्ट झाले आहे. जलसंपदा विभागाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या धरण साठा आकडेवारी अहवालातून हे उघड झाले आहे. जिल्ह्यातील उजनी धरणांत सध्या फक्त १३.२५ टीएमसी इतकाच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. या धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे हे प्रमाण एकूण पाणीसाठ्याच्या तुलनेत केवळ २४.७२ टक्के इतकेच आहे. गेल्या वर्षी याच धरणांतील आजच्या तारखेचा उपलब्ध पाणीसाठा हा ५८.८३ टीएमसी (११० टक्के) इतका उपलब्ध होता. यानुसार उजनी धरणांत गेल्या वर्षीच्या उपलब्ध पाणीसाठ्याच्या तुलनेत यंदा ४५.५८ टीएमसी कमी पाणीसाठा आहे. दरम्यान, पुणे जिल्ह्यात टाटा उद्योग समूहाची सहा धरणे आहेत. या सहा धरणांमध्ये मुळशी, ठोकरवाडी, शिरोटा, वळवण, लोणावळा आणि कुंडली यांचा समावेश आहे. या सहा धरणांची एकूण पाणी साठवण क्षमता ही ४२.७६ टीएमसी इतकी आहे. यापैकी सध्या ३४.९० टीएमसी (८१.६१ टक्के) उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.पुणे जिल्ह्यातील २६ धरणांमध्ये मिळून आजअखेरपर्यंत (ता.११) फक्त १३३.१२ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. सध्याच्या उपयुक्त पाणीसाठ्याचे हे प्रमाण एकूण पाणीसाठ्याच्या तुलनेत ६७.११ टक्के इतके आहे. दरम्यान, यंदाच्या पावसाळ्यात कमी पाऊस झाल्याने, गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेच्या तुलनेत सध्याचा पाणीसाठा हा ६०.३० टीएमसीने कमी आहे. गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेला जिल्ह्यातील धरणांमध्ये एकूण १९३.४२ टीएमसी इतका पाणीसाठा उपलब्ध होता.

# वालचंदनगरच्या कामगारांचे अर्धनग्न आंदोलन

## वालचंदनगरच्या कामगारावर उपासमारीची वेळ



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

चांद्रयान, गगनयान, मंगळयान, सुर्ययानासारख्या मोहिमेची महत्वाची उपकरणे तयार करणाऱ्या वालचंदनगर (ता. इंदापूर) येथील वालचंदनगर कंपनीतील ६३० कामगारावर उपासमारीची वेळ आली आहे. २० दिवसापासुन कंपनीचे कामगार संपावरती असून कंपनीचे व्यवस्थापन दुजाभाव करीत असल्यामुळे कामगारांनी अर्धनग्न आंदोलन करुन व्यवस्थापनाचा निषेध केला. वालचंदनगर कंपनीतील आयएमडी कामगार समन्वय संघाच्या ६३० कामगारांनी २२ नोव्हेंबर पासुन संपास सुरुवात केली आहे. कामगारांनी शांततेमध्ये संप करण्याचा निर्धार केला असून दररोज एक तास युनियनच्या कार्यालयासमोर एकत्र बसून चर्चा करीत आहेत.

यासंदर्भात आयएमडी कामगार समन्वय संघाचे अध्यक्ष कपिल गायकवाड व जनरल सेक्रेटरी शहाजी दबडे यांनी सांगितले की, वेतनवाढीच्या कराराची मुदत ३ वर्षाची असते. व्यवस्थापन वेळेमध्ये करार पूर्ण करीत नाहीत. दीड ते दोन वर्ष वेतनवाढीचा कराराची बोलणी सुरु ठेवून करार जाणीवपूर्वक रखडवला जातो. यापूर्वीचे करार देखील असेच रखडवून कामगारांना मेटाकुटीस आणले होते. आत्तापर्यंत २१ बैठका झाल्या असून कामगारांच्या प्रश्नावर तोडगा निघत नाही. कामगारांवर व्यवस्थापन अन्याय करीत आहे. तसेच कामगारांची तीन पगार व इतर देणी थकीत असताना व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांचे एकाचदिवशी दोन पगार करुन कामगारांच्या जखमेवरती मीठ चोळल्याचा प्रकार घडला असल्याचे सांगून कामगारांनी व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांचा निषेध करुन अर्धनग्न आंदोलन केले.

### कामगारांच्यामध्ये फुट प्रयत्न...

**» आयएमडी कामगार समन्वय संघाचे अध्यक्ष कपिल गायकवाड व जनरल सेक्रेटरी शहाजी दबडे यांनी सांगितले की,कामगारामध्ये अफवा पसरविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु आहे. अफवा पसरवून कामगारांच्यामध्ये फुट पाडण्याचे कटकारस्थान सुरु आहे. मात्र कामगार अफवेला बळी पडणार नाही. कामगारांचे एकजुट भक्कम आहे. एक कामगार कामावरती तर सर्व कामगार कामावरती, एक कामगार बाहेर तर सर्व कामगार एकाच वेळी बाहेर कामगार संघटनेचे असे सुत्र आहे. कामगार संघटना वेतवाढीचा करार व कामगारांच्या मागण्यावरती ठाम असून मागण्या मान्य झाल्याशिवाय कामावरती न जाण्याचा निर्धार केला आहे. कामगारांच्या पाठीशी संघटना कायम उभी राहणार आहे.**